| Published Date: | 5 Sep 2018 | Publication: | Mahasagar (Marathi) |
|---|---|---|---|
| Edition: | Nagpur | Page No: | 4 |
| MAV/CCM: | 20384/31.85 | Circulation: | 25200 |

महासागर

# संचित खेडकर आणि अर्चित वेणुगोपालन ने सेंटर पॉइंट स्कूल, वर्धमान नगर, नागपूरकडून टीसीएस आयटी विझ २०१८ च्या नागपूर आवृत्तीमध्ये यश पटकावले

**नागपूर, ४ सप्टेंबर:** टीसीएस आयटी विझ, या भारतातील सर्वात मोठ्या आंतरशालेय क्विझ स्पर्धेचे टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस)तर्फे आयोजन करण्यात येते, टीसीएस ही अग्रणीची आयटी सेवा, समुपदेशन आणि व्यावसायिक उपाययोजना देणारी कंपनी आहे. कंपनीतर्फे ४ सप्टेंबर, मंगळवारी, नागपुरातील डॉ. वसंतराव देशपांडे हॉल, एमएलए हॉस्टेल समोर, सिविल लाइन्स येथे आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेत तब्बल ८५० पेक्षा जास्त शालेय विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

लक्षणीय प्रमाणात वाढत असलेल्या तंत्रज्ञान कौशल्यांचे सबलीकरण व्हावे व त्यासाठी जागरुकता वाढावी हे ध्येय ठेवून ही स्पर्धा आयोजित करण्यात येते, आठवी ते बारावीमधील विद्यार्थ्यांसाठी दमदार लढतीची ही स्पर्धा माहितीचा साठा देणारी आहे. प्रत्येक शाळा दोन विद्यार्थ्यांच्या विविध टीम पाठवू शकते. तसेच या स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क आकारण्यात येत नाही.

टीसीएस आयटी विझमध्ये यंदा तांत्रिक ट्रेंड्सचा समावेश करण्यात आला आहे, तसेच ॲनिमेटेड सॉफ्टवेअर वापरून गंमतीदार फेऱ्या घेण्यात आल्या, यामुळे प्रेक्षक आणि टीममध्ये उत्सुकता ताणली गेली होती. यात मास पर्सन्लायझेशन, लिव्हर्जिंग इकोसिस्टम, क्रिएटिंग एक्सपोनेन्शल व्हॅल्यू आणि एम्ब्रेसिंग रिस्क अशा पाच फेऱ्या घेण्यात आल्या होत्या, शिवाय टीसीएस५० ही विशेष फेरीही घेण्यात आली. क्विझच्या व्यासपीठावर जगभरात मोठ्या प्रमाणात व्यवहार करणाऱ्या तांत्रिक ट्रेंड्सचा समावेश होता. स्पर्धेतील सर्वोत्तम सहा टीम प्रादेशिक अंतिम फेऱ्यांमधील लिखित प्राथमिक फेरीसाठी पात्र ठरल्या होत्या.



प्रादेशिक अंतिम फेरीमध्ये पाच फेऱ्या झाल्यावर संचित खेडकर आणि अर्चित वेणुगोपालन ने सेंटर पॉइंट स्कूल, वर्धमान नगर, नागपूर कडून ही स्पर्धा जिंकली.

यावर्षीच्या प्रादेशिक चॅम्पिअन्सनी तब्बल ६०,००० रुपयांचे गिफ्ट व्हाउचर्स मिळवले, तर जीएच रायसोनी, नागपूर मधील देव अशर आणि गौरव सिंग द्वारे सादर करण्यात आलेल्या उत्तेजनार्थ पारितोषिक विजेत्यांनी ४०,००० रुपये मूल्यांची गिफ्ट व्हाउचर्स पटकावली, शिवाय स्पर्धकांसाठी खास ट्रॉफी आणि मेडल्स तयार करण्यात आली होती. याबरोबरच अंतिम स्पर्धकांनी टीसीएसकडून अनेक बक्षीसे पटकावली, यात जिम बॅग, ब्लूटूथ स्पीकरसह विविध प्रकारे चालणारे सांगितीक टॉर्च आणि वायरलेस आउटडोअर स्पीकर तसेच टीसीएस५० पेन ड्राइव्ह आदी बक्षिसे होती. नागपूरमधील विजेते राष्ट्रीय स्तरावरील अंतिम फेरीसाठी प्रतिनिधित्व करतील, यावेळी भारतभरातून ११ प्रादेशिक चॅम्पिअन्स सहभागी असणार आहेत. टीसीएस नागपूरचे केंद्र प्रमुख अरविन कुमार यांनी बक्षिसांचे वितरण केले.

टीसीएस आयटी विझ २०१८ भारतातील अहमदाबाद, बंगळुरू, चेन्नई, हैदराबाद, कोलकाता, इंदौर, नागपूर, भुवनेश्वर, कोची, दिल्ली, मुंबई आणि पुणे अशा १२ शहरांमध्ये आयोजित केल्या जातील.